The South Asian Academic Research Chronicle ISSN 2454-1109
A Refereed Interdisciplinary Indexed International Open Access Monthly e-Journal
Vol 11.Issue1 & 2; Jan-Feb 2024

# महाराष्ट्रातील संत साहित्याचे योगदान

संजय नामदेवराव आठवले
(संशोधक विद्यार्थी)
भाषा, वाङ्मय व संस्कृती अभ्यास संकुल, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड.

**प्रस्तावना :-**

महाराष्ट्र हा प्रदेश संत महंतांची भूमी म्हणून ओळखला जातो. वारकरी संप्रदायाच्या उदयानंतर अनेक संतांनी महाराष्ट्रातल्या उध्वस्त झालेल्या लोकजीवनाची घडी बसवली. मध्ययुगीन कालखंडात समाजमनावर अंधश्रद्धा व कर्मकांडाचा जबरदस्त पगडा होता. महाराष्ट्रातील सर्वसामान्य माणसे दैववादी बनले होते. कर्मावरील त्यांची निष्ठा ढळली होती. सामान्य जणांची स्थिती फारच बिकट झाली होती. अशा अधोगतीच्या काळात महाराष्ट्रात उदयाला आलेल्या वारकरी संप्रदायाने तत्कालीन मरगळलेल्या समाजात चैतन्य निर्माण करण्याचे मोठे कार्य केले. महाराष्ट्रात संत ज्ञानेश्वर, संत नामदेव, यांच्यापासून संत परंपरेची सुरुवात झाली. या संतांच्या परंपरेतून समाजाच्या विविध स्तरांमधून व जाती-जमातीतून संत पुढे आले. या संत परंपरेत लोकजागृती, लोकप्रबोधनाचे कार्य नेटाने सुरू झाले. या संत मेळ्यात समाजातील विविध जाती-धर्मातील व सर्व स्तरातील संतांनी आपापल्या रचना, अभंग व काव्य रचून मराठी संत साहित्याला समृद्ध केले आहे. प्रस्तुत शोधनिबंधाचा हेतू हा महाराष्ट्रातील संत साहित्याचे योगदान अभ्यासणे हा आहे.

**महाराष्ट्रातील संत साहित्याचे योगदान :-**

मध्ययुगीन काळामध्ये महाराष्ट्रात सामाजिक व सांस्कृतिक जीवनात परिवर्तन घडवून आणण्याचे प्रभावी कार्य वारकरी संप्रदायाने केले आहे. संत ज्ञानेश्वर, संत नामदेव, संत एकनाथ, संत तुकाराम, या संतांमुळे वारकरी पंथाला नवी दिशा व चालना मिळाली. खऱ्या अर्थाने संत परंपरेचा, संत साहित्याचाही प्रारंभ झाला. संत चळवळीचे पंढरपूर हे केंद्र होते, तर विठ्ठल हे त्यांचे दैवत होते. संत नामदेव आणि संत ज्ञानेश्वर यांच्या प्रभावळीत अनेक संतांनी आपल्या अभंगाद्वारे संत साहित्याला समृद्ध केले आहे. या प्रभावळीमध्ये अनेक जाती-जमातींच्या संतांचा समावेश होतो. त्यामध्ये, संत चोखामेळा, संत नरहरी, संत गोरोबा, संत शेख महंमद, संत सेना, संत सावता माळी या संतांबरोबर संत कवयित्रींचाही या वारकरी संप्रदायात संत म्हणून समावेश होतो. त्यामध्ये संत सोयराबाई, संत जनाबाई, संत निर्मळाबाई, संत कान्होपात्रा, संत मुक्ताबाई व संत बहिणाबाई शिऊरकर या स्त्री संतांचा समावेश होतो. हे सर्व संत मंडळी पंढरपूरातल्या चंद्रभागेच्या काठी वारकरी भक्तीसागर न्हावून निघाले. त्यांनी त्यांच्या अभंग रचनेद्वारे समाजामध्ये समतेचा प्रसार केला.

संत नामदेव हे वारकरी संप्रदायाचे श्रेष्ट संत व कुशल संघटक होते. तसेच ते उत्तम कीर्तनकारही होते. आपल्या अभंग रचनेतून व कीर्तनाच्या माध्यमातून त्यांनी महाराष्ट्रातील सर्व जाती-जमाती मधल्या स्त्री-पुरुषांना एकत्र करून त्यांच्या समतेची भावना निर्माण केली. **'नातू कीर्तनाचे रंगी। ज्ञानदीप लावू जगी।।'** ही संत नामदेवांची प्रतिज्ञा होती. संत नामदेव यांनी लिहिलेली पदे शिखांच्या

'गुरुग्रंथसाहेब' या ग्रंथात समाविष्ट केली आहेत. नामदेवांच्या अभंगासंदर्भात ज्येष्ठ समीक्षक दादा गोरे लिहितात, "नामदेवांचा विशेष हा की ज्ञानेश्वरांना त्यांनी भक्तिमार्ग शिकवला. संत नामदेवांच्या सहवासात आल्यानंतर ज्ञानेश्वराने अभंग रचना केली असावी. तुकाराम आणि नामदेवांच्या अभंगातून दिसून येणारा भक्तीभाव ज्ञानेश्वरांच्या अभंगात वेगळा आहे. नामदेव तुकारामांच्या अभंगातून दिसून येणारी भक्ती भावनेची आर्तता ज्ञानेश्वरांच्या अभंगातून नामदेवाइतकी उत्कट आलेली दिसत नाही."[१] समीक्षक दादा गोरे यांनी संत नामदेवांच्या अभंग रचनेविषयी केलेले विवेचन रास्त ठरते. संत नामदेव यांच्या अभंगाविषयी प्रा.राजू बड्रे लिहितात, "आपल्या काव्य निर्मितीत आणि कर्तृत्वाद्वारे संत नामदेवांनी समाजाला मानवता, भूतदया, शांती, सर्वाभूती प्रेमभाव, संत महात्म्यातून आदर्श व्यक्ती आणि भक्ती यांची महती शिकवली. निरागसता, कोमलता, मनाचे औदार्य आणि विशालता हा त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा स्थायीभाव होता"[२] प्रा. डॉ. राजू बड्रे यांनी संत नामदेव यांच्या काव्य निर्मिती विषयी केलेले विधान रास्त ठरते.

संत ज्ञानेश्वर हे वारकरी संप्रदायातील सर्वात महान संत होते. त्यांनी 'भगवद्गीता' या संस्कृत ग्रंथाचा मराठी भाषेत अनुवाद करून 'भावार्थदीपिका' म्हणजेच 'ज्ञानेश्वरी' हा ग्रंथ लिहिला. त्यानंतर त्यांनी 'अमृताअनुभव हा ग्रंथ लिहिला. या ग्रंथातून व अभंगातून त्यांनी खितपत पडलेल्या समाजाला भक्ती मार्गाचे महत्त्व सांगितले. संत ज्ञानेश्वर यांनी वारकरी संप्रदायाला सामाजिक व सांस्कृतिक प्रतिष्ठा मिळवून दिली. ज्ञानेश्वरीतील पसायदान हे उदात्त संस्कार करणारे आहे. विश्वात्मक बंधुभाव व एकरुपतेचा संदेश देणारे आहे. पसायदान म्हणजे मानवाच्या कल्याणासाठी विश्वात्मक देवाला केलेली प्रार्थना आहे. निसर्गातील फळे, फुले, नद्या, वृक्ष, समुद्र सूर्य, निर्झर, चंद्र, तारे हे एकोप्याने राहतात. त्यांचे उदाहरण देत समस्त मानवानेही गुण्यागोविंदाने राहावे हा संदेश संत ज्ञानेश्वरांनी त्यांच्या अभंगातून दिला आहे.

**'जे खळांची व्यंकटी सांडो। तयां सत्कर्मी रती वाढो।**
**भूतां परस्परें पडो। मैत्र जीवांचें।**
**दुरिताचें तिमिर जावो। विश्व स्वधर्मसूर्यें पाहो।**
**जो जें वांछील तो तें लाहो। प्राणीजात।'**

संत ज्ञानेश्वर यांनी आपल्या पसायदानातून माणसाने आपल्या मनातील दुष्टावा नाहीसा केला पाहिजे म्हणून 'खळांची व्यंकटी सांडो' असे म्हटले आहे किंवा 'दुरितांचें तिमिर जावो' असे म्हटले आहे. दुरित म्हणजे दुष्कर्म होय. या जगातून दुष्कर्माचा अंधार कायमचा नाहीसा झाला पाहिजे. आयुष्यात ज्याला जे जे हवे आहे ते त्याला मिळो अशी विश्वकल्याणाची प्रार्थना संत ज्ञानेश्वरांनी पसायदानातून केलेली आहे. महाराष्ट्रातील सर्व संतांनी विश्वकल्याणचा संदेश दिला आहे.

संत एकनाथ हे महाराष्ट्रातील श्रेष्ठ संत होते. संत एकनाथ यांनी विपुल व विविध प्रकारचे साहित्य लिहिले आहे. यामध्ये अभंग, गौळणी, भारुडे यांचा समावेश होतो. संत एकनाथ यांनी 'भावार्थरामायणा'चे लेखन करून त्याद्वारे लोकजीवनाचे चित्रण केले आहे. संत एकनाथ यांच्या अभंगातून जिव्हाळा प्रतीत होतो. संत एकनाथ हे खऱ्या अर्थाने लोकशिक्षक होते. संत एकनाथ यांची

सर्वधर्मसमभावनेची शिकवण दिली. इतर धर्माचा तिरस्कार करणाऱ्यांवर त्यांनी आपल्या अभंगातून प्रहार केला आहे. संत एकनाथांनी खंडित झालेली वारकरी संप्रदायाची पताका पुन्हा महाराष्ट्रभर फडकवली.

संत तुकाराम यांनी विपुल प्रमाणात अभंग रचना केली आहे. त्यांची अभंग रचना प्रसन्न व प्रासादिक अशी आहे. त्यांच्या अभंगांमुळे त्यांना श्रेष्ठ कवित्वाची उंची प्राप्त झाली आहे. संत 'तुकारामांची गाथा' ही मराठी भाषा व साहित्याचा अनमोल ठेवा आहे. संत तुकारामाने आपल्या अभंगातून समाजातल्या रंजल्या गांजल्यांमध्ये देव पाहण्याचा संदेश दिला आहे. **'जे का रंजले गांजले। त्यांसी म्हणे जो आपुले। तोचि साधू ओळखावा देव तेथेचि जाणावा।'** संत तुकाराम यांनी त्यांच्या अभंगातून समाजातील अंधश्रतेवर दांभिकतेवर अतिशय कठोर शब्दात टीका केली आहे. भक्तीला नीतीची जोड देण्यावर त्यांचा कटाक्ष होता. **'जोडोनिया धन उत्तम व्यवहारे। उदास विचारे वेच करी।।'** ही त्यांच्या अभंगातील शिकवणूक होती. संत तुकाराम यांच्या अभंगरचने संदर्भात डॉ. संभाजी जाधव लिहितात, "संत तुकारामाने ज्याप्रमाणे चारित्र्यवान समाज साहित्यातून अपेक्षिला आहे, तसाच तो एकसंघ ही अपेक्षिला आहे. त्यांनी वर्ण-जाती द्वेषास दूर करण्यासाठी मोठ्या प्रमाणात अभंग रचना केली आहे. त्याचप्रमाणे समाजातील अज्ञान जाणून समाज ज्ञानी कसा होईल यासाठी ते प्रयत्नशील राहिले."[3] संत तुकारामांच्या अभंग रचनेसंदर्भात डॉ. संभाजी जाधव यांनी केलेले विवेचन रास्त ठरते.

संत रामदास यांनी आपल्या साहित्यातून बलोपासनेचे महत्त्व सांगितले आहे. **'मराठा तितुका मेळवावा। महाराष्ट्र धर्म वाढवावा'** हा मोलाचा संदेश त्यांनी जनसामान्यांना दिला आहे. त्यांनी दासबोध, मनाचे श्लोक, करुणाष्टके या साहित्याद्वारे सामान्य जनतेला व्यवहारिक शिक्षणाचा मूलमंत्र दिला आहे. तसेच लोकसंघटनेचे व लोकचळवळीचे महत्त्व प्रतिपादित केले आहे. संत रामदासांनी सामान्य जणांना विश्वकल्याण व्हावे यासाठीचा संदेश दिला आहे.

**"कल्याण करी देवराया, जन हेत विवरी।**
**तळमळ तळमळ होतचि आहे, हे जन हातीं धरीं।"**

संत रामदास यांच्या रचनेतून जनहिताची तळमळ प्रकट झाली आहे. म्हणून ते परमेश्वराजवळ विश्वातल्या सर्वसामान्यांचे कल्याण व्हावे हे मागणे मागतात. संत प्रभावळीतील संत चोखामेळा यांनी आपल्या अभंगातून तत्कालीन अंधश्रद्धा, कर्मकांडे, जातीयता, अस्पृश्यता, माणसातील भेदभाव, विषमता व उच्च-निच्चतेविरोधात आवाज उठवला आहे.

**"हीन याती माझी देवा। कैसी घडे तुझी सेवा।।**
**मज दूर दूर हो म्हणती। तुज भेटू कवण्या रिती।।"**

प्रस्तुत अभंगातून संत चोखोबांनी विठ्ठलाकडे हीन, दीनतेची व्यथा मांडली आहे. संत चोखामेळा यांच्या अभंगाविषयी व योगदानाविषयी डॉ. म.ई.तंगावार लिहितात, "मराठीतील पहिले दलित कवी म्हणून संत चोखामेळा यांचा उल्लेख करावा लागतो. जसे आधुनिक महाराष्ट्रातील पहिले विद्रोही लेखक म्हणून महात्मा ज्योतिबा फुले ओळखले जातात, तसे मध्ययुगीन काळातील महाराष्ट्रातील पहिले विद्रोही संत कवी म्हणून संत चोखामेळा यांचा विचार करावा लागतो. तेराव्या, चौदाव्या शतकात चंद्रभागेच्या

तीरावर वाळवंटात संत ज्ञानेश्वर व संत नामदेवांनी अध्यात्मिक लोकशाहीची स्थापना केली. संत चोखामेळा यांच्या जडणघडणीत संत नामदेवांचा वाटा सिंहाचा आहे. संत नामदेव जन्माला आले नसते तर विठ्ठल भारतमय झाला नसता. चोखामेळा यांच्यासारख्या दलित कवींच्या कविताही जन्माला आल्या असत्या काय? संत साहित्य संथ आहे. त्यात वर्तमानकाळ नाही. असा काही अभ्यासकांचा गैरसमज झालेला आहे. अन्याय, अत्याचाराच्या विरोधात संतांनीही वाचा फोडली. त्यातूनच विठ्ठलाचा धावा त्यांनी केला. याचेच एक उदाहरण म्हणून संत चोखामेळा यांच्या अभंगाचा विचार करता येईल. जातीभेदाविरुद्ध चोखामेळांनी विठ्ठलाकडे अभंगाद्वारे तक्रार नोंदवून स्वाभिमानाने जगण्याचा प्रयत्न केला. समकालीन परिस्थिती, विठ्ठलाविषयीची करुणा, तमभिंतीआड आक्रन्दणारी मानवता व वेदनेचा हुंकार हे चोखामेळांच्या विद्रोहाचे वेगळेपण म्हणून नोंदवता येईल."[४] संत चोखामेळा यांनी त्यांच्या अभंगांतून उपेक्षिततेच्या अंतरंग विश्वाचे चित्रण केले आहे.

संत जनाबाईनेही आपल्या अभंगातून विठ्ठलाचे गोडवे गात स्त्रीच्या अन्यायाविरुद्ध हुंकार प्रकट केला आहे.

**'डोईचा पदर आला खांद्यावरी। भरल्या बाजारी जाईन मी।।**
**हाती घेईन टाळ, खांद्यावरी वीणा। आता मज मना कोण करी।।'**

प्रस्तुत अभंगातून संत जनाबाईने त्या काळात स्त्रियांवर रूढी, परंपरा, धार्मिक व सामाजिक संकेतांना धुडकावून लावले आहे. तत्कालीन स्त्रियांना समानतेची वागणूक देण्याचा संदेश दिला आहे. संत सावता माळी यांनी आपल्या अभंगातून तत्कालीन समाजातील कर्मठतेविरुद्ध आवाज उठवला आहे.

**'भली केली हीन याती। नाही वाढली महंती।**
**जरी असता ब्राह्मणजन्म।तरी हे अंगी लागते कर्म।'**

संत सावता माळी यांनी प्रस्तुत अभंगातून सामाजिक दुःख प्रकट केले आहे. असहायता व आगतिकतेचा स्वर उमटवला आहे. संत कान्होपात्रा या संत कवयित्रीने स्त्रियांच्याप्रती असलेली दुबळी अगतिकता, मनाची तळमळ व व्याकुलता प्रकट केली आहे. आपले स्वत्व जपण्यासाठी समाजाशी सर्वतोपरी संघर्ष करण्याचे सुचवले आहे.

संत गाडगे महाराज यांनी आपल्या खंजिरी वादनाद्वारे लोकप्रबोधन केले. खंजिरी प्रबोधनातून गावोगाव जाऊन सामाजिक प्रबोधन केले. सामाजिक प्रबोधन करताना त्यांनी प्रत्यक्ष कृतीवर भर दिला. आपल्या अभंगातून त्यांनी सामान्य जणांना उपदेश केला. वेळ वाया घालवणे, वायफळ गप्पा मारणे या मानवी सवयी बदलण्याचा त्यांनी प्रयत्न केला. अज्ञानी राहण्यापेक्षा शिक्षण घेऊन मोठे व्हावे, ज्ञानी व्हावे अशी शिक्षणाची महती सांगितली.

**'नको धर्मकृत्ये पैसा खर्चूनिया**
**घेण्यासाठी विद्या तोच खर्चा।।**
**स्वतःचा उद्धार करा प्रयत्नाने**
**शक्तीने, मुक्तीने सुखी व्हावे।।'**

शिक्षण घेतल्यामुळे माणूस सुसंस्कृत व हुशार होतो. त्यातून माणूस एकमेकांना जोडला जातो. चांगल्या वृत्तीमुळे चांगल्या कृतीमुळे मानवाचे कल्याण होते, हा महत्त्वाचा संदेश त्यांनी आपल्या काव्यातून दिला आहे.

संत तुकडोजी महाराज यांनी आपल्या ग्रामगीतेतून सर्वसामान्यांना स्वच्छतेचे महत्व सांगितले आहे. आपले गाव म्हणजे देवाचे मंदिर आहे आणि या मंदिरात मानव हाच देव आहे म्हणजेच 'मानव देव मूर्ती सुंदर' असे त्यांनी म्हटले आहे. समाजातील अज्ञान नाहीसे झाले पाहिजे. समभावनेची कास धरली पाहिजे. ज्ञान-विज्ञानाचा ध्यास घेतला पाहिजे. सर्वांनी ग्रंथांचे वाचन केले पाहिजे. माणसाने जीवनामध्ये सत्यच बोलले पाहिजे, असा संदेश त्यांनी आपल्या कवितेतून दिला.

**'सर्व विश्वचि व्हावे सुखी। ही धर्माची दृष्टि नेटकी।**
**ती अनावी सर्व गावलोकी। तरीच लाभ।।'**

संत साहित्याच्या योगदानाबद्दल डॉ. चंद्रशेखर भगत लिहितात, "संत साहित्याने समाजाला संवेदनशीलता शिकवली. जीवन जगताना काटेकोरपणे, शिस्तबद्ध वागण्याची रीत दाखवून दिली. स्त्री-पुरुष भेद किंवा वर्ण व्यवस्थेतील भेदाभेद मोडीत काढून समाजात ऐक्य नांदवले. श्रमप्रतिष्ठा, भोळ्या-चुकीच्या समजुती, प्रथांविरुद्ध त्यांनी मोठे सामाजिक पाऊल उचलले. धर्मसहिष्णुता, सौजन्यशीलता, राष्ट्रभक्ती, देव-देश धर्मासाठी एकात्मता असावी हे सामाजिक मूल्य शिकवले. संतांचे अभंग, ओवी, वृत्त, छंदातील रचना काव्यातील विविध प्रकार यामुळे संतांनी समाज जीवन समृद्धपणे घडविले असे म्हणता येईल."[१] अभ्यासक डॉ. चंद्रशेखर भगत यांनी संत साहित्याच्या योगदानाबद्दल केलेले विवेचन रास्त ठरते.

संत साहित्यातून नीतीमूल्यांची संतांनी सर्वसामान्यांना शिकवण दिली आहे. संत नामदेव यांनी जनसामान्यांचे लौकिक जीवन उंचावण्यासाठी पुराणातील काही चरित्रांचा उपयोग करून समाजात नीतीमूल्यांची रुजवणूक केली. पुराणातील आदर्श जीवनरूपे संत नामदेव यांच्या चरित्र काव्यातून चित्रित झालेली दिसून येतात. संत ज्ञानेश्वरांनीही त्यांच्या अभंगातून नीतीमूल्यांचे महत्त्व सांगितले आहे. त्यांच्या अभंगातून प्रामुख्याने नीतीमूल्यांविषयीचे चिंतन आढळून येते. त्याचप्रमाणे संत सेना न्हावी यांच्या अभंगातूनही व्यक्तित्वातील नीतीकल्पना प्रकट झाली आहे. मानवी नैतिकता उंचावण्यासाठी त्याचे मन हे त्यांनी महत्त्वपूर्ण मानले आहे. मानवी मनावर जसे संस्कार होतील, तशी त्याला शिकवण मिळत असते. त्यावरच त्याचे चांगुलपण अवलंबून असते, असा संदेश त्यांनी त्यांच्या अभंगातून दिला आहे.

महाराष्ट्रातील सर्व संतांनी त्यांच्या अभंगातून, त्यांच्या काव्यातून मानवाच्या कल्याणासाठी व प्रगतीसाठी चिरंजीव उपदेश केले आहेत. एकात्मतेने राहावे, कुणालाही त्रास देऊ नये, माणसाने माणसाला दुःख देऊ नये, शक्यतो दुसऱ्यांच्या उपयोगी पडावे, हीच खरी मानवता आहे. संतांनी आपल्या अभंगातून मानवतेचा संदेश दिला. मानवतेची शिकवण दिली. माणसांची मने ही सुसंस्कृत असायला हवी. राक्षसी वृत्तीचे दालन व्हावे, माणसांची मने जर सुंदर झाली तर राष्ट्राची श्रीमंतीही वाढते. याकडे महाराष्ट्रातील संतांनी सामान्य जणांचे लक्ष वेधले आहे. संत वाङ्मयाचा विचार सांगताना

डॉ. कालिदास गुडदे लिहितात, संतांनी अध्यात्म जनलोकांना समतेच्या पातळीवर जाऊन सांगितले. म्हणून संत साहित्य वगळून महाराष्ट्राची पुरोगामी चळवळ पुढे जाऊ शकत नाही. संत साहित्यातील समतावाद माणसाला माणूस म्हणून जगवणारा आहे. अध्यात्म म्हणजे वरवरची ढोंगी भक्ती नव्हे, तर अंतर मनाची मशागत आहे. हा विचार त्यांनी लोकांना शिकवला. नव्हे आचरणात आणण्यास भाग पाडला. आचरणामुळे अध्यात्म, समाज आणि देशाची उन्नती होते हा विचार त्यांनी ठासून समाजात सातशे वर्षांपूर्वी रुजवला. हाच त्याचा वटवृक्ष झाला आहे. म्हणून आधुनिक समाजाने संत साहित्यातील समतावाद या विचाराचे आचरण करून समाजकारण, राजकारण करावे. तरच समाजाने देश सुजलाम, सुफलाम होईल."[६]संत साहित्याच्या योगदानाविषयी संत साहित्याचे अभ्यासक डॉ. कालिदास गुदडे यांनी केलेले विवेचन रास्त ठरते. अशाप्रकारे संत साहित्याचे महाराष्ट्राच्या वाङ्मयीन समृद्धीसाठी भरीव व मोलाचे योगदान दिसून येते.

**निष्कर्ष :-**

१) मराठी संत साहित्याने महाराष्ट्रातील सामाजिक आणि सांस्कृतिक जडणघडीत मोलाचे योगदान केले आहे.

२) महाराष्ट्रातील संतांनी आपल्या संत साहित्यातून मानवता धर्म व माणुसकीची शिकवण दिली आहे.

३) संत साहित्याने महाराष्ट्रातील जनसामान्यांना शिस्तबद्ध वागण्याची रीत आणि जीवन जगताना काटेकोरपणाची शिकवण दिली आहे.

४) संत साहित्यातून सौजन्यशीलता, राष्ट्रभक्ती, सर्वधर्मसहिष्णुता, एकात्मता या सामाजिक मूल्यांचा संदेश प्राप्त होतो.

५) महाराष्ट्रातील संतांनी आपल्या साहित्यातून सामाजिक, आर्थिक, राजकीय आणि सार्वत्रिक विषयांवर सखोल विवेचन केले आहे.

६) महाराष्ट्रातील संत साहित्यातून अहिंसा, दया, सेवा, परोपकार, समता, बंधुता, भूतदया, एकसंघत्व, एकात्मता, एकमेकांप्रती प्रेम आदी मूल्यांची शिकवण जनसामान्यांना दिली आहे.

७) संत साहित्य हे वर्तमान स्थितीत उपयुक्त असून अभंग, ओवी, वृत्त, छंद रचना, यामुळे मराठी संत साहित्य समृद्ध झाले आहे.

**संदर्भ सूची :-**

१) गोरे दादा- आस्वाद समीक्षेचा, गोदा प्रकाशन, औरंगाबाद, प्र. आ. १०१६, पृष्ठ-११

२) जंबाले विठ्ठल, रनखांब सर्जेराव, दुडूकनाळे राजेश्वर-मराठी साहित्य समाज आणि संस्कृती, अथर्व पब्लिकेशन्स धुळे, प्र. आ. २०२३, पृष्ठ-२९८

३) तैत्रव,पृष्ठ-२९०

४) तैत्रव, पृष्ठ-२८४

५) तैत्रव, पृष्ठ-२९५

६) तैत्रव, पृष्ठ-३१२